# नंदवाळ एक दुर्लक्षित धार्मिक पर्यटन स्थळः एक चिकित्सक अभ्यास

श्री एन.के. बनसोडे

श्री एस.एन. साळोखे,

श्री के.एन. सोनटक्के

**प्रास्ताविकः—**

आज पर्यटन हा जगातील सर्वात मोठा आणि वेगाने विकसित होणारा आर्थिक व्यवसाय आहे. भारतात भौगोलिक , ऐतिहासिक, सांस्कृतिक घटक पर्यटकांना आकर्षण घेत आहेत. महाराष्ट्रात तर 2011 हे वर्ष पर्यटन वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. महाराष्ट्रात वेगवेगळया धार्मिक पर्यटन स्थळाचा विकास झालेला दिसून येतो.

नंदवाळ हे कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील एक धार्मिक ठिकाण आहे. नंदव ाळ येथे विठ्ठल मंदिर असून त्याला प्रति पंढरपूर म्हणूनही ओळखले जाते. परंतु पर्यटन विकासाच्या दृष्टीने विचार करता हे ठिकाण पूर्णपणे दुर्लक्षित राहिले आहे. या पर्यटन स्थळाचा विकास कसा करता येईल. तेथील समस्या व उपाययोजना यांचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत शोध निबंधात नंदवाळ एक दुर्लक्षित धार्मिक पर्यटन स्थळ :एक चिकित्सक अभ्यास हा विषय शोध निबंधासाठी निवडला आहे.

**अभ्यास क्षेत्र—**

नंदवाळ हे महाराष्ट्रातील कोल्हापूर जिह्याच्या करवीर तालुक्यातील दक्षिणेला कोल्हापूरपासून 10 किलोमीटर अंतरावर आहे. या गावचे एकूण क्षेत्रफळ 1718.80चौ.कि.मी. एवढे असून गावचा भौगोलिक विस्तार $16^{0}37'35''$ उत्तर अक्षवृत्त व $74^{0}11'0''$ पूर्व रेखावृत्त आहे.

2001 च्या जनगणना अहवालानुसार नंदवाळ गावची लोकसंख्या 1539 एवढी आहे. नंदवाळच्या उत्तरेस वाशी, दक्षिणेस जैताळ, पश्चिमेस कांडगाव, पूर्वेस बालिंगा ही गावे आहेत.

**अभ्यासाची उद्दिष्टये (उद्देश)—**

1) नंदवाळ येथील धार्मिक पर्यटन स्थळाचा मागोवा घेणे.

2) नंदवाळ हे पर्यटन विकासाच्या दृष्टीने दुर्लक्षीत का राहिले यामागील कारणांचा शोध घेणे.

3) नंदवाळ या पर्यटन ठिकाणच्या विकासासाठी उपाययोजना सुचविणे.

**अभ्यास पध्दती—**

प्रस्तुतच्या शोध निबंधासाठी आवश्यक असणारी प्राथमिक आकडेवारी प्रत्यक्ष पर्यटन स्थळाच्या ठिकाणी जावून प्रश्नावलीच्या साहय्याने व तेथील प्रमुख लोकांच्या मुलाखती घेवून मिळविले आहे ही प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी आम्ही 216 भाविकांचे रॅण्डम नमुना पध्दतीने

निवड केली. तर दुय्यम आकडेवारी करवीर महात्म्य ग्रंथ,पुस्तके, नियतकालिके, जिल्हा जनगणना अहवाल, इंटरनेट यावरून संकलीत केलेली आहेत. या पर्यटन स्थळाची वास्तव माहिती फोटोग्राफीच्या सहाय्याने दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. भाविकाकंडून उपलब्ध झालेल्या माहितीवर प्रक्रिया करून तिचे टक्केवारीत रूपांतर करून ती माहिती उपयुक्त तक्त्याच्या सहाय्याने दर्शविण्यात आली आहे.

**विषय विवेचनः**

**1) नंदवाळ येथील धार्मिक पर्यटन केंद्र**

**अ) विठ्ठल मंदिर–**

महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर दक्षिण करवीर काशी या तालुक्यातील नंदवाळ येथे प्राचीन हेमाडपंथी विठ्ठल मंदिर असून दक्षिण महाराष्ट्रातील हे एक प्रमुख तीर्थक्षेत्र आहे. हे मंदिर करवीरपासून 10 कि.मी. अंतरावर आहे. प्राचीन काळी नंदवाळला नंदग्रामी म्हणून उल्लेख आढळतो. नंदवाळ येथे पंढरपूरचा विठोबा हा दररोज मुक्कामासाठी येत असतो. हा पांडुरंग बत्तीस योगी असून पंढरपूरचाा अठ्ठावीस युगी आहे असाउल्लेख आढळतो.

आज नंदवाळला प्रति पंढरपूर म्हणूनही ओळखले जाते. या पांडुरंगाच्या दर्शनासाठी प्रत्येक एकादशीला हजारो भाविक दर्शनासाठी येतात. आषाढी यात्रेनिमित्त किमान दोन ते तीन लाख भाविक येतात. व प्रत्येक वारीला 20 ते 30 हजार भाविक येतात. पंढरपूर यात्रेप्रमाणेच येथेही दिंडया, पालखी व रिंगण सोहळा असतो.

**1) दिंडया व रिंगण सोहळा–**

आषाढी एकादशीनिमित्त जवळजवळ 50 च्या आसपास स्थानिक भागातील दिंडया येतात. यामध्ये शेळकेवाडी, देवाळे, महे, बाचणी, हळदी, कुर्डू, कोथळी, सडोली, हसूर, कणेरीवाडी, गिरगांव, म्हालसवडे, शिंगणापूर, आरे, गाडेगोंडवाडी, सातार्डे, चाफोडी, राशिवडे, बरगेवाडी, अर्जुनवाड, तांदुळवाडी, बेले, कुशिरे, कारभारवाडी इ.गावातील दिंडया येतात. या दिंडयामधून जवळजवळ 20 हजार भाविक सहभागी होतात.

कोल्हापूरातून ज्ञानेश्वर माऊली भक्त मंडळातर्फे मंगळवार पेठेतील विठ्ठल मंदिराच्या परिसरात विविध गावातील दिंडयाचेही आगमन होते. नंतर त्या सर्व दिंडया सकाळी 10 च्या सुमारास पुईखडी येथील संकल्प सिध्दी मंगल कार्यालयासमोर येतात. व तिथे रिंगण सोहळा अतिशय विलोभनीय पध्दतीने पार पाडला जातो. येथे भक्तांची गर्दी आलोट असते. तसेच या दिंडयामध्ये अनेक गावातील भजनी मंडळही सहभागी असतात. रिंगण सोहळा समाप्त झाल्यानंतर सर्व दिंडया नंदवाळकडे प्रयाण होतात.

2) वर्षनिहाय भाविकांची संख्यां—

| | भाविकांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|
| वर्ष | आषाढी वारी | माघवारी | चैत्रवारी | कार्तिक वारी |
| 2000 | 10000 | 2000 | 1500 | 2500 |
| 2002 | 45000 | 9000 | 4500 | 10000 |
| 2004 | 100000 | 14000 | 11000 | 15000 |
| 2006 | 150000 | 16000 | 13000 | 17000 |
| 2008 | 200000 | 18000 | 16000 | 19000 |
| 2010 | 250000 | 20000 | 18000 | 22000 |
| 2011 | —— | 25000 | —— | —— |

**स्त्रोतः** प्राथमिक माहिती (14.02.2011 रोजी सर्व्हेक्षण करून मिळाली)

गेल्या दहा वर्षातील भाविकांच्या आकडेवारीचा अभ्यास केल्यास प्रत्येक वर्षी आषाढी एकादशीस भाविकांची संख्या वाढत असल्याचे दिसते. सर्वात जास्त 2010 मध्ये आषाढी वारीला 250000 भाविक आलेले होते. त्याचबरोबर माघवारी, चैत्रवारी, कार्तिक वारीलाही भाविकांची संख्या वाढत आहे.

**3)भेट देणाऱ्या भाविकांचे वर्गीकरण—**

**3.1) वयोगटानुसार भाविकांचे वर्गीकरण—**

| वयोगट | पुरूष | स्त्री | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 0 ते 10 | 09 | 05 | 14 | 6.48% |
| 11 ते 20 | 12 | 07 | 19 | 8.80 % |
| 21 ते 30 | 25 | 12 | 37 | 17.13% |
| 31 ते 40 | 30 | 14 | 44 | 20.37 % |
| 41 ते 50 | 55 | 30 | 85 | 39.35 % |
| 50 पेक्षा जास्त | 10 | 07 | 17 | 7.87% |

**स्त्रोतः** प्राथमिक माहिती(14.02.2011 रोजी सर्व्हेक्षण करून मिळाली.)

आम्ही निवडलेल्या एकूण 216 भाविकांचे वयोगटानुसार वर्गीकरण केले असता सर्वात जास्त 39.35 टक्के भाविक हे 41 ते 50 या वयोगटातील आढळले. व सर्वात कमी 6.48 टक्के भाविक हे 0 ते 10 वयोगटातील आढळले. यावरून असे दिसून येते की, 41 ते 50 वयोगटातील भाविकांची गर्दी जास्त आहे.

**3.2) भाविकांचे प्रवास अंतरानुसार वर्गीकरण–**

| अंतर कमी | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| 0 ते 20 | 95 | 43.98% |
| 21 ते 40 | 106 | 49.07% |
| 41 त 60 पेक्षा जास्त | 15 | 6.94% |

स्त्रोत– प्राथमिक माहिती (14.02.2011 रोजी सर्व्हेक्षण करून मिळाली.)

भाविकांचे प्रवास अंतरानुसार वर्गीकरण केल्यास सर्वात जास्त 49.07भाविक हे 21 ते 40 कि. मी. अंतरावरून येतात. त्या पाठोपाठ 43.98टक्के भाविक हे 0 ते 20 किमी. अंतरावरून येतात. यावरुन असे दिसून येते की, भागातील भाविकांची संख्या जास्त आहे.

**3.3) वर्षातील भाविकांची ये–जा–**

| किती वेळा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| एकदा | 77 | 35.65% |
| दोनदा | 96 | 44.44% |
| तीनदा | 40 | 18.51% |
| चार पेक्षा जास्त | 03 | 1.39 % |

**स्त्रोत–प्राथमिक माहिती (14.02..2011 रोजी सर्व्हेक्षण करून मिळाली.)**

वर्षातील भाविकांची ये–जा यांचा अभ्यास केल्यावर असे दिसून येते की, सर्वात जास्त 44. 44टक्के भाविक हे दोनदा वर्षातून दर्शनासाठी येतात. त्यापाठोपाठ 35.65 टक्के भाविक हे एकदा वर्षातून दर्शनासाठी यावरून असे दिसून येते की, आषाढी व कार्तिक वारीला भाविक वर्षातून दोनदा नंदवाळला भेट देतात.

### 3.4) भाविकांचे वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण–

| रक्कम हजारात | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 ते 20 | 55 | 25.46% |
| 21 ते 40 | 88 | 40.74% |
| 41 ते 60 | 45 | 20.33% |
| 60 ते 80 | 18 | 8.33% |
| 80 पेक्षा जास्त | 10 | 4.66% |

स्त्रोत–प्राथमिक माहिती (14.02.2011 रोजी सर्व्हेक्षण मिळाली.)

येणाऱ्या भाविकांचे वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण केल्यास 40.74 टक्के भाविकांचे वार्षिक उत्पन्न 21 ते 40 हजार आहे. त्या पाठोपाठ 25.46 टक्के भाविकांचे वार्षिक उत्पन्न 1 ते 20 हजार आहे. यावरून असे आढळते की, कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या भाविकांचे प्रमाण जास्त आढळते.

वरील सर्व घटकाच्या विश्लेषणावरून असे दिसून येते की, या पर्यटन ठिकाणाला काही मूलभूत सुविधा पुरविल्यास थोडया कालावधीत हे पर्यटन स्थळ विकसित होईल.

**ब)भीमाशंकर मंदिर–**

नंदवाळ क्षेत्राच्या पूर्व बाजूस हे तीर्थक्षेत्र आहे. त्या ठिकाणी पुरातन महादेवाचे लिंग आहे. त्या लिंगाला कान लावला असता आतून पाणी वाहण्याचा आवाज ऐकू येतो. त्या ठिकाणी गुप्त नदी वाहते. अजूनही त्या लिंगाच्या सभोवती पाण्याचे कारंजे आहेत. ते कारंजे त्या लिंगावरून वाहतात. भीमाशंकर हे तीर्थक्षेत्र महाराष्ट्रात दोन ठिकाणी आहे. त्यातील एक नंदवाळ हे होय. या ठिकाणी प्रत्येक श्रावण सोमवारी यात्रा भरते. शेजारी भीमाशंकर तलाव आहे. तलाव व मंदिरामुळे हे सुध्दा पर्यटन स्थळ म्हणून विकसित होऊ शकते.

**2)नंदवाळ धार्मिक पर्यटन स्थळ दुर्लक्षित राहण्याची कारणे**

नंदवाळ या ठिकाणी भाविकांची मोठी ये जा असून सुध्दा या ठिकाणाचा पर्यटन केंद्र म्हणून विकास होऊ शकलेला नाही. विकास न होण्यापाठीमागील कारणांचा शोध आम्ही प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन प्रश्नावली व मुलाखतीद्वारे घेतला आहे ती कारणे पुढीलप्रमाणे–

| अ.नं. | कारणे | होय | टक्केवारी | नाही | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वाहतुकीच्या साधनांची समस्या | 205 | 94.90% | 11 | 5.1% |
| 2 | वाहनासाठी पार्किंगची समस्या | 190 | 87.96% | 26 | 12.04% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | निवासविषयक समस्या | 207 | 95.83% | 9 | 4.17% |
| 4 | आरोग्यविषयक समस्या | 25 | 11.57% | 191 | 88.43% |
| 5 | स्वच्छतेविषयक समस्या | 95 | 83.98% | 121 | 56.02% |
| 6 | शौचालयविषयक समस्या | 165 | 76.39% | 51 | 23.61% |
| 7 | जागेविषयक समस्या | 155 | 71.76% | 61 | 28.24% |
| 8 | केरकचऱ्याविषयी समस्या | 75 | 34.72% | 141 | 65.28% |
| 8 | दुकानदारविषयक समस्या | 45 | 20.83 | 171 | 79.17% |

स्त्रोत– प्राथमिक माहिती(14.02.2011 रोजी सर्व्हेक्षण करून मिळाली.)

1) नंदवाळ हे राज्य महामार्गापासून (कोल्हापूर–राधानगरी) 2 कि.मी.अंतरावर असून ही पुरेशी प्रवासी वाहतून साधने नाहीत. कोल्हापूर या शहरापासून बसची सुविधा नसल्यामुळे भाविकांना त्या ठिकाणी सहजासहजी पोहचता येत नाही.

नंदवाळ सर्वेक्षणात एकूण सर्वेक्षण केलेल्या 94.90 टक्के भाविकांना वाहतुकीची समस्या जाणवते हे दिसून आले.

2) या ठिकाणी मुख्य वारीला येणाऱ्या भाविकांच्या वाहनासाठी कोणतीही पार्किंग व्यवस्था मंदिर परिसरात उपलब्ध नाही.

आम्ही केलेल्या सर्वेक्षणात 87.96 टक्के भाविकांना वाहनासाठी पार्किंगची समस्या जाणवलेली आहे.

3) या ठिकाणी येणाऱ्या भाविकांसाठी निवास व्यवस्थेचा अभाव आढळतो.

नंदवाळ सर्वेक्षणात एकूण सर्वेक्षण केलेल्या 95.83 टक्के भाविकांना निवासाची समस्या जाणवते.

4) या ठिकाणी येणाऱ्या भाविकांसाठी कोठेही शौचालय आढळत नाही. आमच्या सर्वेक्षणात 76.39 टक्के भाविकांना ही समस्या जाणवते.

5) विठ्ठल मंदिराच्या आजुबाजूला गावातील लोकांची घरे असल्यामुळे मंदिर विकासासाठी अपुऱ्या जागेमुळे मंदिराच्या परिसरात कोणतेही विकास कामे झालेली नाहीत. जागेविषयी प्रश्न जवळजवळ 71.76 टक्के भाविकांनी सांगितला आहे.

6) या ठिकाणी भाविकांच्या आवश्यक असणाऱ्या कोणत्याही मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. उदा– हॉटेल्स

7) या ठिकाणच्या विकासासाठी या मंदिरातून कमी प्रमाणात आर्थिक उत्पन्न उपलब्ध होते. याबाबत शासनाचेही दुर्लक्ष आहे. या आर्थिक अडचणीमुळे येथे सोपी व सुविधांचा विकास झालेला नाही.

8) विठ्ठल मंदिरापासून भीमाशंकर मंदिरापर्यंत कच्चा व खराब रस्ता असल्यामुळे त्या ठिकाणी भाविक जात नाहीत.

9) हे मंदिर प्राचीन असले तरी त्याची फारशी प्रसिध्दी झाली नसल्यामुळे हे ठिकाण बऱ्याच लोकांना अपरिचित आहे. त्यामुळे दूर अंतरावरील भाविक फारसे येत नाहीत. फक्त स्थानिक लोकांचाच देवदर्शनासाठी सहभाग जास्त आढळतो.

**3) नंदवाळ परिसर पर्यटन विकासासाठी उपाययोजना**

1) कोल्हापूर या जिह्याच्या ठिकाणाहून विशेष बस सुविधा सुरू करणे आवश्यक आहे. याबरोबरच रस्ते विकास अंतर्गत नंदवाळला जाणारा वाशी ते नंदवाळ रस्ता, नंदवाळ ते जैताळ मार्गे येणार रस्ता व नंदवाळ– भीमाशंकर मंदिर – गारगोटी रस्त्याला मिळणारा रस्ता तयार केल्यास प्रवासी वाहतूक साधनांचा विकास होऊन पर्यटन विकासास हातभार लागेल.

2) प्रमुख वारीदिवशी गावाच्या 85 हेक्टर गायरान क्षेत्रावर वाहनांची पार्किंग सुविधा निर्माण करून पार्किंग कर ठेवल्यास गावाचे आर्थिक उत्पन्न वाढून पर्यटन ठिकाणाचा विकास होण्यास चालना मिळेल व पार्किंगची समस्या सुटेल.

3) खाजगी व राज्य सरकारच्या मदतीने या परिसरात भक्ती–निवास व भोजन व्यवस्था केल्यास येणाऱ्या भाविकांची संख्या वाढून रोजगार निर्मिती होऊन या पर्यटन ठिकाणच्या विकासास मदत होईल.

4) मंदिराच्या आजुबाजूस असलेल्या घरांना पर्यायी जागा उपलब्ध करून दिल्यास मंदिराचा विकास चांगल्या प्रकारे करता येईल.

5) येणाऱ्या भाविकासाठी काही मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यास येणाऱ्या भाविकांमध्ये वाढ होऊन पर्यटन विकासास चालना मिळले. उदा–शौचालय.

6) येणाऱ्या भाविकांचा विचार करता शासनाने येथील विठ्ठल मंदिरास 'ब' वर्ग दर्जा दिल्यास या तिर्थक्षेत्राचा विकास कमी कालावधीत होईल.

7) मंदिरापासून जवळच असलेल्या भीमाशंकर मंदिराजवळील भीमाशंकर तलावामध्ये बोटींगची व्यवस्था केल्यास पर्यटकांना बोटिंगचा आनंद घेता येईल व यातून आर्थिक उत्पन्नही मिळले.

9) नंदवाळ पर्यटन ठिकाणाची माहिती राज्य, देश व जागतिक पातळीवर दिल्यास अनेक स्थानिक देशी व विदेशी पर्यटक या ठिकाणी आकर्षित होतील. व त्यातून पर्यटन विकासाला चालना मिळेल.

10) या ठिकाणाला भेट देणाऱ्या भाविकांकडून कर रूपात पैसा उपलब्ध केल्यास मंदिराच्या परिसर विकासास हातभार लागेल.

**सारांश**

नंदवाळ हे ठिकाण विठ्ठलाचे माहेरघर किंवा प्रंति पंढरपूर म्हणून ओळखले जाते. त्यामुळे दर एकादशीला या ठिकाणी येणाऱ्या भाविकांची संख्या मोठया प्रमाणात आहे. परंतू या ठिकाणी भाविकांच्या दृष्टीकोनातून कोणत्याही पायाभूत सुविधा उपलब्ध नाहीत. जर या ठिकाणी पर्यटनाच्या दृष्टिकोनातून पायाभूत सुविधा उपलब्ध केल्या तर एकादशीविषयी आसपासचे लोक या ठिकाणाला भेट देतील व त्यामुळे लोकांच्या उत्पन्नातही वाढ होईल.

**संदर्भ–**

1) करवीर महात्म्य ग्रंथ : अध्याय 47 वा , पान क्र. 186–187

2) कोल्हापूर जिल्हा गॅझेटियर

3) इंटरनेट विकी पेडीया वेबसाईट

4) दै. सकाळ, लोकमत.